# कंपनीशाही की लोकशाही?

## एसईझेडचे राजकारण

**राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केन्द्र, पुणे**

●
कंपनीशाही की लोकशाही ?
‘एसईझेड’चे राजकारण

●
राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र

●
संपादन : संपत काळे, संजय संगवई

●
मुखपृष्ठ : रीतुपर्णा बॅनर्जी

●
मार्गदर्शन : अमिताभ बेहार

●
प्रथमावृत्ती : जानेवारी, २००७

●
मुद्रक :
क्रिएटर्स, ७५९/९७ सी, डेक्कन जिमखाना
पुणे ४११ ००४
प्रकाशक :
नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज
सेरिनिटी कॉम्प्लेक्स, रामनगर कॉलनी,
पाषाण, पुणे ४११ ०२१.
फोन : ०२०-२२९५२००३/४
०२०-२२९५१८५७
e-mail : ncas@vsnl.com
Website : www.ncasindia.org
© एन. सी. ए. एस. २००७
केवळ खासगी वितरणासाठी

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | दृष्टिक्षेपात ‘सेझ’ | ५ |
| २. | ‘सेझ’चा कायदा व राजकारण | ९ |
| ३. | सेझ : कंपनीशाही ! | १७ |
| ४. | सेझचा बुलडोझर रोखलाच पाहिजे ! | २१ |
| ५. | संघर्षाचे नवे मार्ग हवेत | २६ |
| ६. | सरकारमान्य स्वस्त व सुलभ – रिअल इस्टेट योजना | २९ |
| ७. | महाराष्ट्रातील ‘सेझ’ची स्थिती | ३२ |
| ८. | सेझविरोधी संघर्ष करणाऱ्या संघटना व पक्ष | ३९ |

विशेष आर्थिक क्षेत्राचा (स्पेशल इकॉनॉमिक झोन) मुद्दा भारतात अत्यंत वादग्रस्त होत आहे. देशातील शेतकरी, कष्टकरी, पुरोगामी – लोकशाहीवादी संघटना व नागरिक त्याला विरोध करीत आहेत. ‘सेझ’ धोरण, कायदा व अंमलबजावणीचे जनविरोधी व देशविरोधी स्वरूप पुढे आणण्याचा हा प्रयत्न आहे. सेझविरोधी संघर्ष बळकट होण्यासाठी ही पुस्तिका उपयुक्त ठरेल अशी आशा वाटते. यापूर्वी एन.सी.ए.एस. ने काढलेल्या पुस्तिकेचा तसेच हिंदी व मराठी सीडीज्‌चा या लढ्यात उपयोग झाला आहे. ह्या पुस्तिकेचा कार्यकर्ते, अभ्यासक, पत्रकार व सामान्य नागरिकांना उपयोग व्हावा ही अपेक्षा.

# विशेष आर्थिक क्षेत्रांची वैशिष्ट्ये

**• केंद्र सरकारने विशेष आर्थिक क्षेत्रा (सेझ)चे धोरण २००० साली आणले व २००५ साली कायदा करण्यात आला. • सन २००६ मध्ये नियम-नियमावली तयार करण्यात आली व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १० फेब्रुवारी २००६ पासून सुरु झाली. • सध्या देशात २२ राज्ये व केंद्रशासित प्रदेश मिळून ४०३ सेझला मान्यता मंडळाने मंजूरी दिली आहे. • महाराष्ट्रात ७५ ठिकाणी सेझ येत आहेत. • सेझसाठी एकूण १,५०,००० हेक्टरहून अधिक जमीन संपादित करण्याची सरकारने तयारी दर्शविली आहे.**

**अ. सेझ विकासकांना जमीन विषयक लाभ :**

- बहु-उत्पादक सेझसाठी किमान १००० हेक्टर
- बहु-सेवा - १०० हे.; विशिष्ट क्षेत्र - १०० हे.;
- माहिती तंत्रज्ञान - १० हे.; बिल्टअप एरिया - १०,००० चौमी.
- हिरे व अलंकार १० हे.; बायोटेक अपारंपारिक ऊर्जा - १० हे.

महाराष्ट्रात सेझ क्षेत्राच्या २५ टक्के भागात आपल्या व्यवसायाची युनिट्स उभारता येतील.

**आ. वित्तीय सवलती :**

- विआक्षेच्या केवळ ३५ टक्के भाग उद्योगांच्या इमारतीसाठी वापरण्याचे बंधन आहे. बाकी जागेची कशाही तऱ्हेने विभागणी करण्यास व वापरास संपूर्ण स्वातंत्र्य.
- मुद्रांक व नोंदणी शुल्क, विक्रीकर, खरेदी कर, जकात कर, सीमा-शुल्क (कस्टम), सेवा कर, बाजार कर, उलाढाल कर व अन्य कर.
- भांडवली साधनसामग्री, कच्चा माल व डीजी सेटस्पर्यंत उपभोग्य वस्तू, सुटे भाग, इत्यादी गोष्टी कुठल्याही परवान्याशिवाय वा विशिष्ट

संमतीशिवाय आयात करू शकतात.

- विआक्षेत १५ वर्षाच्या काळात कुठल्याही १० वर्षांच्या खंडासाठी आयकरात सूट.
- विआक्षेत्रातील उद्योगांना आपल्या उत्पादनाचे वा उत्पादन प्रक्रियेचे भाग देशांर्गत इतर भागात अथवा केवळ निर्यातक्षेत्रात या अन्य विआक्षेत्रात व परदेशात पोट-कंत्राट पद्धतीने देता येतील.
- विनाशर्त १०० टक्के थेट परदेशी गुंतवणूकीला मुभा.
- विआक्षेत्रामध्ये परदेशी बँकांच्या शाखा सुरू करण्यास मान्यता.
- त्यांना नफ्यावर ३ वर्षांसाठी आयकरात १०० टक्के सूट तर त्यापुढील २ वर्षांसाठी ५० टक्के सूट मिळेल.

**इ. पर्यावरणीय कायद्यात सूट :**

- विशेष आर्थिक क्षेत्राची व त्यातील पर्यावरणीय समीक्षा (Environmental Impact Assessment EIA) होण्याची गरज नाही. त्या विआक्षेत्राच्या आयुक्ताकडून तसे प्रमाणपत्र पुरसे आहे.
- पर्यावरणीय परिणाम या तपासणीसाठी सार्वजनिक सुनावणीतून सूट देण्यात आली आहे.
- पर्यावरणीय नियमांचे पालनाबद्द खासगी एजन्सीकडून 'पालन अहवाल' (compliance report)
- ना-प्रदूषण उद्योगांबद्दल कोणतीही 'मंजुरी' घ्यावी लागणार नाही.
- किनारा नियंत्रण क्षेत्रातल्या (सीआरझेड) विशेष आर्थिक क्षेत्रात प्रदूषण न करणारे उद्योग : माहिती तंत्रज्ञान व त्याच्या सुविधा, गोल्फ कोर्स, पाणी शुद्धीकरण, हॉटेल्स व विना-प्रदूषणकारी सेवा उद्योग स्थापित करण्यास परवानगी.

**ई. कामगार कायदे :**

- प्रत्येक विआक्षेत्र (सेझ) हा 'सार्वजनिक उपयोगाची सेवा म्हणून जाहीर केला जाईल.
- सेझ क्षेत्रात औद्योगिक तंटा कायदा, प्रॉव्हिडंट फंड, कामगार कल्याण,

कामाची स्थिती, मालकाची जबाबदारी, कामगाराची नुकसानभरपाई, अपंगत्व व वृद्धत्व पेन्शन, गरोदरपणाचे लाभ व सवलती, यासंबंधी केलेले नियम व कायदे लागू नाहीत.

- महाराष्ट्रात व बहुतेक सर्व राज्यात खालील कायद्यांच्या बाबतीत मंजुरीचे अधिकार त्या 'सेझ'च्या विकास आयुक्ताकडे वर्ग करण्यात आले आहेत –

  बालकामगार कायदा, १९८६; समान वेतन कायदा, १९७६; स्थलांतरीत कामगार (रोजगार व कामाची स्थिती नियंत्रण) कायदा, १९७९; महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता कायदा, १९६३; किमान वेतन कायदा, १९४८; मोटार ट्रान्स्पोर्ट कायदा, १९६१; पेमेंट ऑफ बोनस कायदा, १९६५; ग्रॅच्युइटी कायदा, १९७२; पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६.
- या क्षेत्रातील उद्योगांमध्ये सर्व कामगार कायद्यांनुसार एकजात मंजुरीचे अधिकार त्या क्षेत्रातील विकास आयुक्ताला देण्यात येत आहेत.
- कामगार कायद्याचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यासाठी विआक्षेत्राच्या विकास आयुक्ताची पूर्व परवानगी लागेल.
- औद्योगिक तंटा कायद्यात सुधारणा करण्याचा प्रस्ताव असून कंत्राटी कामगार नियंत्रण व निर्मूलन कायद्याच्या कक्षेतून अनेक सेवांना वगळण्याचे दिसत आहे.

**उ. राजकीय :**

- व्यापार, साधारण भार (ड्यूटी) व आयात–निर्यात शुल्काच्या (टॅरिफ) दृष्टीने परकीय भूप्रदेश मानला जाईल.
- केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील विआक्षेत्रे सोडून बाकीच्या विआक्षेत्रांतील कारभार व देखभालीचे खासगीकरण केले आहे. महाराष्ट्राच्या धोरणात विआक्षेत्रांना आद्योगिक नगर म्हणून घोषित करून स्वायत्त स्थानिक संस्थांप्रमाणे तयार केले जाईल.

- या विआक्षेंना स्थानिक राज्य सरकार, ग्रामपंचायत, जिल्हा पंचायत किंवा नगरपालिकांचे नियंत्रण व कायदे लागू नसतील. यापुढे शहर विकासाचे काम राज्य सरकार वा नगरपालिका यांच्याकडे नसून कॉर्पोरेट नवी शहरे स्थापन करतील.
- उद्योगांना स्वत:ची संरक्षक यंत्रणा तयार करण्याचे अधिकार आहेत. या क्षेत्रांना पोलीस, तपासयंत्रणा, न्यायव्यवस्थाही वेगळी असावी. त्यांच्या निर्णयाविरुद्ध फक्त उच्च न्यायालयातच दाद मागता येऊ शकते.
- या क्षेत्रात कोणत्याही कर्मचारी व अधिकारी याने चांगल्या हेतूने काही केले असल्यास व त्यामुळे प्रचलित कायद्याचे उल्लंघन झाल्यास त्यांच्यावर खटला भरला जाऊ शकत नाही.
- या सेझ कायद्याच्या विरोधात अन्य कायद्यात, नियमात, काहीही असले तरी ते लागू होणार नाही. (क्रेंद्रीय एस.ई.झेड. कायदा, २००५, (VII/5B).

• • •

# ‘सेझ’चा कायदा व राजकारण

**संजय संगवई**

विशेष आर्थिक क्षेत्र कायदा (स्पेशल इकॉनॉमिक झोन–सेझ) मे २००५ मध्ये भारतीय संसदेने संमत केला. तेव्हा यावर संसदेत व बाहेर चर्चाच झाली नाही. त्यामुळे असा कायदा बनत आहे व त्यात विशिष्ट कलमे आहेत याची कल्पना जनतेला व अन्य जनसंघटनांना झाली नव्हती. राज्यसभेत तर त्यावर केवळ तीन तास चर्चा झाली व सर्व पक्षांनी कायद्याला मंजूरी दिली. या कायद्यानुसार विशेष आर्थिक क्षेत्राचे नियम २००६ मध्ये तयार केले गेले.

सेझ कायद्यासंबंधी धोरणाची चर्चा २००० सालापासून सुरू होती. त्यावेळी भारत सरकारने सेझविषयक धोरण जाहीर केल्यावर काही ठिकाणी ‘सेझ’ स्थापन केले गेले. अनेक राज्यांनी आपले सेझ धोरण जाहीर केले. ह्याला वैध रूप २००६ पर्यंत प्राप्त झाले. भारतातील निर्यातीला प्राधान्य व अग्रक्रम देण्यात येऊन त्या द्वारे परकीय चलन वाढवणे, परकीय भांडवल गुंतवणूक वाढवणे व या सर्वाद्वारे सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढवून विकास साधणे हे उद्दिष्ट होते. निर्यात वाढावयाची असेल तर निर्यात करावयाच्या वस्तू स्वस्त व आंतरराष्ट्रीय बाजारातील स्पर्धेत टिकायला हव्यात म्हणून त्यावरचे सर्व प्रकारचे कर काढून टाकण्याचे तसेच कायद्याची बंधने काढून टाकण्याचे समर्थन केले जाते. उद्योगपतींना आकर्षण वाटावे म्हणून कोणत्याच कायद्याची ‘बंधने’ नकोत असेही ठरलं. कामगार, पर्यावरण, कंपनी

कायद्यांबरोबरच पंचायत कायदे, स्थानिक स्वराज्य संस्था कायदे, नियम किंवा भारतातील कोणतेही कायदे व नियम या 'सेझ' कायद्याच्या विरोधात असतील तर रद्द समजले जाण्यापर्यंत सोय या निर्यातप्रधान आर्थिक कार्यक्रमासाठी केली गेली.

या कायद्याला अनुसरून किंवा त्याहून दोन पावले पुढे जाऊन आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, उत्तर प्रदेश, झारखंड, ओरिसा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, तमीळनाडू, चंदीगड व प. बंगाल या राज्यांनी आपली सेझ धोरणे बनविली. गुजरातने सेझ कायदाच बनविला. त्यात केंद्रीय कायद्यातील तरतुदींबरोच काही नवीन तरतुदीही आहेत.

## सेझचा संदर्भ

सेझसंबंधी धोरण व कायदा हा १९९० नंतरच्या भारतातील बदलत्या अर्थ–राजकारणाच्या पार्श्वभूमीवर येतो. या काळात भारतातील राज्यकर्त्यावर्गाचे रूप बदलले होते. तसेच प्राधान्यक्रम व धोरणे बदलली. या काळात बाजार व विक्री–खरेदी यातूनच विकास होईल व देशाचे उत्पन्न वाढेल असा समज रूढ झाला. काही जणांकडे पैसा आला की 'देशाचे' सकल राष्ट्रीय उत्पन्न (Gross Domestic Product- GDP) वाढते व त्यामुळेच राष्ट्राचा विकास होतो; या गृहितकानुसार उद्योगपती, व्यापारी यांना खुल्या बाजाराच्या नावावर विशेष सवलती देणे, सबसिडी देणे सुरू झाले. पैसेवाल्यांनीच अधिक पैसा जमवणे यात काहीच गैर नाही ही धारणा बनून सामाजिक समता व समाजातील निम्न आर्थिक स्तरांसाठी फार तर काही सवलती देता येतील. मात्र समान वाटप, विकेंद्रित उत्पादन तंत्र व साधने, बाजारातील समान स्थानाची सुरक्षितता, सार्वजनिक सेवा, गरीब–मागासवर्गीयांना खास अधिकार, आरक्षण, शेतकरी, आदिवासी, कामगार, मागासवर्गीयांचे अधिकार, पर्यावरणरक्षण, समान कायदा सर्वांना लागू होणे, धनवंतांना विशेषाधिकार नसणे – इत्यादी बाबींना गुंडाळून ठेवले गेले.

याचीच अंमलबजावणी म्हणून शहरातील कमाल जमीन धारणा कायदा

आता गुंडाळून टाकण्यात येत आहे. पर्यावरणीय निर्बंध शिथिल करण्यात येत असून किनाराक्षेत्र नियंत्रण कायदा काढूनच टाकला जात आहे. मोठ्या प्रकल्पांसाठी पर्यावरणीय समीक्षा आता नाममात्र केली जाणार आहे व प्रकल्पकर्त्यांनी व उद्योजकांनीच पर्यावरणीय सुरक्षिततेची ग्वाही द्यायची अशी नवी पद्धत (सेल्फ सर्टिफिकेशन) येत आहे. कामगार कायदे शिथिल करून अनेक ठिकाणी ते लावले जात नाहीत. कामगारांच्या संप–मोर्चे या अधिकारांवर मर्यादा येत आहेत. दलित–मागासांच्या आरक्षणाला विरोध होत आहे. खासगी क्षेत्रात आरक्षणाचे नाव नको अशी भूमिका आहे. विकास प्रकल्पांच्या नावावर विस्थापन अधिकाधिक सुलभ व्हावे अशा तरतुदी केल्या जात आहेत. त्यासाठी भूसंपादन कायद्याचा मनमानी पद्धतीने वापर होत आहे. पर्यटनाच्या माध्यमातून व अन्यत: जंगल, समुद्रकिनारे, नद्यांचे पट्टे यांचे खासगीकरण होत आहे. पाण्याचे व पाणीपुरवठ्याचे कंपनीकरण होत आहे.

शेती दिवसेंदिवस आतबट्ट्याची व्हावी याची संस्थात्मक व कायदेशीर तजवीज होत आहे. एकीकडे शेतमालाला हमीभाव व हमी खरेदीची घसरण सुरू झाली आहे. उत्पादन खर्चही न निघणारा हमीभाव (जसे कापूस १७०० रु. क्विंटल, गहू ९५० रु. क्विंटल) जाहीर होत आहे, तर हमी खरेदीची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारे टाळत आहेत किंवा 'विशेष मदत' म्हणून त्याला बिगर–कायदेशीर रूप देत आहेत. दुसरीकडे शेतीच्या क्षेत्रातून सरकार माघार घेत आहे व ते क्षेत्र खासगी नफेखोरांकडे सोपवित आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्यांना सुधारण्याऐजवी त्यांना मोडकळीस आणले जात आहे. सहकारी व ग्रामीण बँका बंद पाडल्या जात आहेत. बीज कायद्यान्वये शेतकऱ्यांचे स्वत:चे बियाण्यांचे वाण सुरक्षित ठेवण्याचे, वापरण्याचे स्वातंत्र्य संकोचले जात आहे. शेतीमध्ये कंत्राटी शेतीला परवानगी दिली गेली व एकाप्रकारे वेठबिगारीचा मार्ग खुला केला गेला. एकीकडे विविध कायदे, धोरणे व प्रत्यक्ष अंमल यांच्या माध्यमातून शेतीला तोट्याची करणे सुरू आहे. तर त्याचाच लाभ घेऊन खासगी भांडवलदारांना शेती व त्याचा व्यापार ताब्यात

घेण्यासाठी मार्ग खुला करून दिला गेला. त्याची सुरुवात ग्रामीण भागातला बाजार ई–चौपालसारख्या खासगी कंपन्या मार्फत ताब्यात घेणे सुरू आहे. दुसरे पाऊल हे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचे व जगण्याचे साधन जमीन ताब्यात घेणे होय.

मोठ्या प्रमाणावर जमिनी ताब्यात घेतानाच सरकारकडून सवलती, सबसिडीज घ्यायच्या, आयकरासह कोणतेही कर द्यायचे नाहीत. जे सामान्य नागरिकाला, सामान्य व्यापारी व उद्योजकाला द्यावे लागतात. पर्यावरण, कामगार, स्थानिक स्वराज्य संस्था, विधिमंडळे असा कोणताही अडथळा त्यांना नको आहे. तसेच त्यांना लहान विकेंद्रित व्यापारी, उद्योजकांकडून ही अडथळा नको आहे. शेती, व्यापार, साधनसंपदा, उद्योग व वित्त या अर्थव्यवस्थेच्या महत्वाच्या अंगावर एकत्रित पकड बसवण्याचा एक सर्वसमावेशक मार्ग आहे विशेष आर्थिक क्षेत्र!

**विलक्षण मतैक्य**

या कायद्यानुसार या पुढील सर्व प्रक्रियांना अधिमान्यता देण्यात येणार आहे. ऑक्टोबर २००६ पर्यंत सुमारे ४०३ विशेष आर्थिक क्षेत्रांना देशभरात मान्यता देण्यात आली आहे. अद्यापही शेकडो प्रस्ताव रांगेत आहेत. या कायद्याच्या अनुषंगाने दोन पावले पुढे जाऊन अनेक राज्य सरकारांनी आपले 'सेझ' धोरण घोषित केले आहे. या सेझ कायद्यात आजवरचे कायदे, कल्याणकारी राज्याची संकल्पना, घटनात्मक मूल्ये, कायद्यांना तर मोडीतच काढले आहेत.

या कायद्यानुसार सेझ क्षेत्रातील आर्थिक एककांमध्ये वस्तूंचे उत्पादन होणे अपेक्षित नाही. त्या उत्पादनाचा अर्थ कोणतेही नवे नाव असलेली वस्तूनिर्मिती, प्रक्रिया – यात रेफ्रिजरेशन, कापणे, पॉलिश करणे, मिश्रण करणे (ब्लेंडिंग), दुरुस्ती (रिपेअर), पुनर्निर्माण, फेरअभियांत्रिकी (री–इंजिनियरिंग), शेती, कोळंबी शेती, पशुपैदास, फलोत्पादन, पुष्पोत्पादन, मस्त्यशेती, कुक्कुटपालन, रेशमी उद्योग, खाणी आदिचा समावेश आहे. त्यात जागतिक व्यापार संघटनेच्या मराक्केश करारातील (१९९४) सेवा–

व्यापाराचाही समावेश आहे. देशातील सर्वांत मोठ्या सेझमध्ये – मुकेश अंबानीच्या रायगड जिल्ह्याच्या १४,००० हेक्टरांच्या 'सेझ'मध्ये व्यापार, सेवा उद्योग, प्रक्रिया उद्योग, मूल्यवाढ (Value addition), पॅकेजिंग, गोदामे, अशा कारवाया चालतील व त्यालाच 'उत्पादन' वा 'आर्थिक' कार्यक्रम म्हणायचे.

विशेष आर्थिक क्षेत्र एखाद्या ठिकाणी कुण्या खासगी मालकाला/प्रवर्तकाला उभारायचे असेल, किंवा सरकार व खासगी असे करायचे असेल तर तो एखादा भाग निश्चित करून, आपली सांपत्तिक–औद्योगिक स्थिती स्पष्ट करून त्या क्षेत्राचा प्रस्ताव देऊ शकतो. अशा 'सेझ'ला मंजूरी देणारे केंद्र सरकारचेच मंजुरी मंडळ (बोर्ड ऑफ अप्रुव्हल) असते. त्यात केंद्रीय व्यापार मंत्रालयाचे सहसचिव (अध्यक्ष) यांसह केंद्रीय महसूल, वित्त, उद्योग, संरक्षण, पर्यावरण, कायदा, परदेशस्थ भारतीय या विभागाचे सहसचिव/उपसचिव, राज्य सरकारचा एक प्रतिनिधी व मॅनेजमेंट संस्थेचा असे फक्त नोकरशहा आहेत. (एसईझेड कायदा २००५, प्रकरण ३, ८–१ ते ३). कोणतीही परदेशी कंपनी ही 'सेझ'च्या प्रवर्तकासाठीचा अर्ज देऊ शकते. तिला भारतीय कंपन्याएवढेच अधिकार आहेत. इथे परदेशी गुंतवणुकीला मुक्तद्वार आहे. त्यावर कसलेच कर, बंधन नाही, जेथे परदेशी बँका सुरू करता येतील. त्यातील पैशांचे येणे–देणे, त्याची गुंतवणूक यावर रिझर्व बँकेचे तर नियंत्रण नाहीच; शिवाय त्यांना आयकरात १००% सूट; अशी आकर्षणे आहेत. ही सर्व 'सेझ' क्षेत्रे व्यापार व आयात–निर्यातीच्या शुल्काच्या दृष्टीने परकीय भूभाग मानली जातील (प्र. ७/५३).

या परकीय भूमीत कोणतेही कर नाहीत. देशाचे अर्थमंत्री श्री. चिदंबरम् मे.–जून २००६ च्या सुमारास म्हणाले की, त्यावेळी केवळ आठ किंवा तत्सम सेझ क्षेत्रांतील करांच्या सवलतीपायी केंद्र सरकारचा रु. १,१७,००० कोटींचा तोटा झाला! एवढे कमी की काय म्हणून प्रत्येक सेझ प्रधिकरणाला केंद्र सरकार कर्ज देऊ शकते! (प्र. ७/३५).

म्हणूनच भारताच्या आर्थिक विकासावर व सार्वभौमत्वावर सेझ हा

घाला आहे असे म्हटले आहे. त्यात 'सेझ' प्रवर्तकांवर कोणतीही जबाबदारी, सरकार व समाजाच्या प्रती उत्तरदायित्व याबद्दल एकही अक्षर नाही.

**कायदा, घटनाच रद्द!**

मात्र याहीपेक्षा चिंताजनक बाब म्हणजे या कायद्याने भारतातल्या कायदा, लोकशाही संस्था व घटनेलाच गुंडाळून ठेवले आहे.

प्रत्येक सेझ प्रदेशाचा विकास आयुक्त केंद्र सरकार नियुक्त करेल. त्याच्यासह जे सेझ प्राधिकरण असेल त्यात सर्व प्रतिनिधी सरकारचे व सेझ प्रवर्तकांचे असतील. त्याला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा दर्जा असून सेझमध्ये पायाभूत सुविधा पुरवणे, येथील मालमत्तांवर कर,–उपकर लावणे हे अधिकार असतील. या विकास आयुक्त व प्राधिकरण यांनी सद्‌हेतूने (in good faith) केलेल्या कोणत्याही कृत्यासंबंधी कायदेशीर दावा/खटला चालू शकणार नाही (७/४८).

सेझ क्षेत्रातील पर्यावरणीय व कामगार कायद्यांनुसार विविध मंजुरीचे अधिकार या विकास आयुक्तालाच असतील. केंद्र सरकारने नेमलेल्या विशेष अधिकाऱ्यानेच सेझ क्षेत्रातील गुन्ह्याबाबत तपास, चौकशी, झडती, जप्ती करायची आहे. त्याशिवाय इतर कुणीही ही कारवाई करायची नाही. या 'सेझ' क्षेत्रातील दिवाणी व फौजदारी दावे चालविण्यासाठी प्रत्येक सेझ क्षेत्राला वेगळे न्यायालय असेल. त्यानंतर त्या निकालाविरूद्ध फक्त उच्च न्यायालयात जाता येईल (५/९४). 'सेझ'मधील एखाद्या व्यक्तीचा नकळत गुन्हा झाला असेल वा त्याने सर्व ती काळजी घेतली असे सिद्ध होत असेल तर त्याला शिक्षा होऊ शकणार नाही (५/२५(११).

या सेझ क्षेत्रातील पंचायती, महापालिका, पालिका, पंचायत समित्या यांना कोणतेच अधिकार राहणार नाहीत. प्रत्येक 'सेझ' क्षेत्र ही एक स्वायत्त नगरपालिका असेल. असे महाराष्ट्र, गुजरात, ओरिसा, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश इ. सर्वच राज्यांच्या सेझ धोरणात स्पष्टपणे नमूद आहे. सेझ क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीला एक ओळखपत्र दिले जाईल (७/४६).

सेझ क्षेत्रात औद्योगिक तंटा कायदा, प्राव्हिडंट फंड, कामाची स्थिती, कामगार कल्याण, कर्मचारी नुकसान भरपाई, अपंगत्व, वृद्धत्त्व पेन्शन, गरोदरपणाचे लाभ यासंबंधी कायदे व नियमात, अधिनियमात केलेल्या बदलांवर कोणतेही निर्बंध नाहीत (७/४९-ब).

**केंद्र सरकारचा अन्य कोणताही कायदा, नियम, अधिनियम, अधिसूचना, आदेश, निर्देश - सेझ क्षेत्राला लागू न होण्यासंबंधी अधिसूचना केंद्र सरकार काढू शकेल (७/४९).**

**सरते शेवटी, या सेझ कायद्याच्या विरोधी देशात लागू असलेल्या इतर कोणत्याही कायदा वा प्रक्रिया यांच्यातील तरतुदींना न जुमानता 'सेझ' कायद्याचा अंमल सुरू राहील (६/५१-१).**

("Provisions of this act shall have effect notwithstanding anything inconsitant therewith contained in any other law for the time being in future or in any instruments of having effect by virtue of law other than this law.")

म्हणजे देशातील कायदे, न्याय, तपास, वैधानिक प्रक्रिया, पंचायत राज्य, सांसदीय प्रणाली व प्रक्रिया यांना या कायद्यानुसार रद्दबातलच ठरवले!

याशिवाय गेल्या अनेक वर्षांपासून देशातल्या साधनसंपदेच्या व निसर्गाच्या संरक्षणार्थ ज्या काही तरतुदी आहेत, त्या नीटपणे राबवण्याऐवजी राज्य वा केंद्र सरकारांनी त्या आता रद्द करण्याचे किंवा शिथिल करण्याचे ठरवले आहे. प्रकल्पांना (EIA) मान्यता देण्यापूर्वी त्या विकास प्रकल्पाची पर्यावरणीय समीक्षा करण्याचा कायदा आता जवळजवळ संपल्यात जमा आहे. प्रकल्पांच्या संदर्भात स्थानीय जनतेसमोर जनसुनावणी करण्याची तरतूद रद्द झाली असून आता या प्रकल्प उद्योगांनी स्वत:च पर्यावरणीय आलबेलत्वाचे स्वत:च सर्टिफिकेट द्यायचे (सेल्फ सर्टिफिकेशन) ही अजब तरतूद ही नोकरशहा व राजकीय वर्गाने टाकली आहे. किनारपट्टी निर्बंध नियमही रद्द होत आहेत. कमाल जमीन धारणा कायदा व शहरी कमाल जमीन धारणा कायदा रद्द करण्यात येत आहे.

एकंदरच ज्या आधारांवर भारतीय राज्य अस्तित्वात आले ते प्रयोजनच

संपविण्याचे तसेच लोकांचे सार्वभौमत्व संपवून (People's sovereignty) काही नोकरशहा, राज्यकर्ते व कार्पोरेट वर्गातच तसेच परदेशी कंपन्यात हे सार्वभौमत्व हस्तांतरित करण्याची फार मोठी खेळी जाणीवपूर्वक खेळली जात आहे. 'सेझ'ची प्रक्रिया धोरण व कायदा हा त्याचाच एक प्रमुख भाग आहे, म्हणून सेझचे धोरण व कायदा रद्द करण्यात आला पाहिजे.

लोकांचे अधिकार, देशाची साधनसंपदा, लोकशाही व घटना तसेच देशाचे सार्वभौमत्व व भारतीय राष्ट्र – राज्याच्या अस्त्विाचे प्रयोजन टिकवायचे असेल तर सेझविरोधी संघर्ष तीव्र, व्यापक व बळकट करण्याचे आव्हान सर्व लोकशाहीवादी व समता–न्यायवादी नागरिक व संघटनांसमोर आहे.

● ● ●

# सेझ : कंपनीशाही !

**संपत काळे**

'एसईझेड'चा कायदा कोणाचा फायदा व कोणाचा तोटा याविषयी गेल्या सात महिन्यांपासून जवळपास सर्वच प्रसारमाध्यमांतून चर्चेला उधाण आले आहे. धोरणकर्ती मंडळी आपापल्या राज्यात जास्तीत जास्त एसईझेड (सेझ) म्हणजेच विशेष आर्थिक क्षेत्र आणण्यासाठी स्पर्धा करत आहेत. सर्वांत आघाडीवर आपले महाराष्ट्र राज्य आहे. सरकारी माहितीनुसार राज्यात मान्यताप्राप्त व तत्वत: मान्यता प्राप्त एकूण ७५ एसईझेडला मंजुरी मिळाली आहे.

या जागतिकीकरणाच्या जमान्यात खूप मोठ्या प्रमाणावर वेगाने घडमोडी होत आहेत व त्याचाच एक परिपाक म्हणजे सेझ सुद्धा. मुक्त व्यापार व मुक्त अर्थव्यवस्थेमुळे गेल्या दशकात अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या देशात आल्या आहेत व सेझमधून जास्तच वाव मिळणार आहे. दीडशे वर्षे राज्य करणाऱ्या गोऱ्या मालकांच्या कंपनी सरकारला पळवून लावण्यासाठी लाखो लोकांनी आपले प्राण पणाला लावले व देशाला परकीयांच्या गुलामगिरीतून बाहेर काढले. हा इतिहास आपण कधीही विसरणार नाही. व्यापारी म्हणून आले अन् राज्यकर्ते बनले. पण यापुढे व्यापारी– भांडवलदारच राज्यकर्ती जमात बनणार आहे. या सर्व बाबींना सरकार खतपाणी घालत आहे ही सर्वात मोठी व आपलं वैभव गहाण ठेवणारी बाब आहे. सरकार, भांडवलदार, उद्योगपती, लक्ष्मीपती या सर्वांनी मिळून देशात कंपनीशाहीस पूरक अशी स्थिती एसईझेडच्या माध्यमातून केल्याचे दिसत आहे.

आपल्या देशाला महासत्ता बनवण्याच्या नादात थेट परकीय गुंतवणुकीसाठी मार्ग मोकळा केला आहे. केंद्रीय वित्तमंत्रालयानुसार ४९ अब्ज

डॉलर्सची गुंतवणूक गेल्या पंधरा वर्षांत आपल्या देशात झाली आहे. पण या उद्योगांना पायाभूत सुविधा देण्यासाठी अनेक पटींने आपल्याला गुंतवणूक करावी लागणार आहे. देशाचा विकास, निर्यात वाढविण्यासाठी 'सेझ'चा कायदा २००५ साली करण्यात आला व त्याच्या नियमांची अंमलबजावणी २००६ पासून सुरू करण्यात आली. सध्या आपल्या देशात एकूण ४०३ सेझला मान्यता मंडळाने मंजुरी दिली आहे. ४०३ पैकी २३७ ला मंजुरी व १६६ ला तत्वत: मंजुरी देण्यात आली आहे. हा आकडा कुठपर्यंत जाईल याचा अंदाज देता येणार नाही. कारण सेझ आणण्यासाठी एकूण २२ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांनी कंबर कसली आहे. मग कोणत्या राज्यात कोणत्या पक्षाचे सरकार आहे याचा काहीही संबंध नाही. सेझसाठी जवळपास १,५०,००० हेक्टर जमीन संपादित करण्याची तयारी सरकार करीत आहे. सेझच्या कायद्यामुळे शेतकऱ्यांना जमीन विकायची की नाही हा पर्यायच उरलेला नाही. कारण राज्य सरकारकडेच जमिनीची शेवटची मालकी आहे. विकासाच्या नावाखाली ब्रिटिशांनी केलेल्या १८९४ च्या कायद्यानुसार जमिनी संपादनाचा सपाटा लावला आहे. गावेच्या गावे, तालुके या सेझसाठी विकासकांना देण्याची तयारी सरकारने दाखवली आहे. पण शेतकरी – भूमिपुत्रांनी आपली जमीन सेझला द्यायला विरोध केला आहे. सेझच्या जाचक कायद्याचा समाजाच्या सर्वच स्तरांतून विरोध होऊ लागला आहे.

सन १९९० पासून खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण (खाऊजा) मुळे जी घुसळण झाली त्यामुळेच आपल्या देशात बहुराष्ट्रीय कंपन्या, कंत्राटी शेती, वॉलमार्ट वजा रिटेल संस्कृती वाढीस लागली आहे. या सर्व घडामोडीतून एक महत्त्वाचा विचार समोर येत आहे तो म्हणजे बाजार व नफा. यापुढे देशाचा विकास करायचा असेल तर बाजाराची स्पर्धा वाढवायची, खासगीकरण करायाचे, धोरणे लवचिक करायची व कंपन्यासाठी मार्ग खुले करायचे असा हा भांडवलदारांचा कावा आहे.

*सेझच्या नावावर जमिनी संपादित करून रिअल इस्टेट करायचा हा प्रकार आहे. कारण सेझ विकासकांना संपूर्ण जमिनी प्रकल्प चालविण्याचे*

*बंधन नाही. केवळ २५% जमिनीवर उद्योग उभारून उर्वरित जमिनीवर व्यापार करायला मोकळे रान असणार आहे.*

जगात महासत्ता असणाऱ्या देशात शेतीवर फारसे अवलंबन नाही. मग आपल्या देशातही त्याचप्रकारे शेतीवरचे अवलंबन कमी करण्यासाठी कृषी व्यवस्थाच मोडकळीस आणण्याचा डाव रचला जात आहे. पण आपल्या देशातील जमीन धारणा हा प्रकार खूप निराळाच आहे. शिवाय समाजव्यवस्थाही खूप वेगळी आहे. याचा विचार न करता केवळ धनदांडग्यांचे उखळ पांढरे करण्यासाठी सरकार उतावीळ झाले आहे.

सध्या आपल्या देशात जवळपास ६२,००० उद्योग रखडलेले आहेत. प्रत्येक उद्योगधंद्यात ३०० ते ५०० मजुरांना रोजगार उपलब्ध झाला असता. पण केवळ पायाभूत सुविधांचा अभाव आहे. म्हणून आपल्या उद्योगांवर संक्रात आणली आहे, मात्र त्याचवेळी भांडवलदारांच्या सेझसाठी मात्र पायाभूत सुविधा करायला सरकार कचरत नाही.

आपल्या राज्यावर एक लाख वीस हजार कोटींचे कर्ज आहे. त्यात भर म्हणजे सेझ विकासकांना करांमध्ये भरमसाठ सवलती व सूटही देण्यात येत आहे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर ताण पडणार हे निश्चितच आहे. देशाच्या अर्थमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार एक लाख  सत्तर हजार कोटींचा कर बुडणार आहे. एक खिडकी योजनेतून विना अडथळा सेझसाठी सर्व सुविधा पुरविल्या जाणार. पण गरीब कातकरी आदिवासींना साधे रेशन कार्डही देणार नाहीत. मग सरकार कुणासाठी? कामगार कायदे, पंचायतराज कायदे, पर्यावरणीय कायदे यांचे सेझच्या कार्यक्षेत्रात काहीही चालणार नाही. म्हणजेच त्यांचा कारभार स्वतंत्र असणार. जणू भारतीय भूमीवर 'परकीय प्रदेश' असणार आहे. सर्व उद्योग हे आय टी– माहिती तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, मोटारगाड्या, गिरण्या यांवर काम करणारे आहेत मग भूमिपुत्रांना कोणत्या नोकऱ्या मिळणार असा प्रश्न उपस्थित होतो.

आतापर्यंत कोणत्याही शेतकऱ्याला कंपनीच्या उद्योगात भागीदारी दिली नाही. नोकऱ्या दिल्या नाहीत, योग्य पुनर्वसन केले नाही. उलट त्यांचे

शोषणच केले आहे. सामाजिक विषमतेवर आधारित विकासाचे हे स्वप्न हे सेझ असणार आहे. गरीबांची उत्पादन साधनांवरची मालकी, त्यांचा वाटा नाकारून देशोधडीला लावण्याचा प्रकार आहे. आतापर्यंत देशातील गरीब लोकांच्या विकासाच्या नावावर, सार्वजनिक हितासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण केले गेले आहे. विकासाची बेटं निर्माण करणं म्हणजे विकास नाही. विकास सर्वांनाच हवा आहे, पण तो सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय न्यायाच्या आधारावर असणारा विकास हवा. कंपनीकरणाला आळा घालण्यासाठी सेझला हटविलेच पाहिजे. अन्यथा स्वातंत्र्य, शांतता, सामाजिक न्याय, उपजिवीकेवरचा अधिकार यांना काहीच अर्थ राहणार नाही.

• • •

# सेझचा बुलडोझर रोखलाच पाहिजे !

**सुलभा ब्रह्मे**

सन २००५ मध्ये केंद्र शासनाने 'विशेष अर्थिक क्षेत्र' उर्फ 'परकीय टापू' (फॉरेन टेरिटरी) प्रस्थापित करण्यासंबंधीचा कायदा संमत केला. २००६ फेब्रुवारीपासून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

**निर्यात वाढीची सबब**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेमध्ये टिकून भारतीय माल खपवता यावा यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात कर व अन्य सवलती देण्यासाठी ही 'खास क्षेत्रे' निर्माण करण्यात येत आहेत असा कायद्याचा उद्देश सांगण्यात येत आहे. वास्तविक पाहता केंद्र शासनाने 'ई.पी.झेड.' अथवा 'एक्स्पोर्ट प्रोसेसिंग झोन्स' स्थापून निर्यातीसाठी अनेक सवलती दिलेल्याच आहेत. या निर्यातक्षेत्राच्या कामगिरीबाबत भारताचा कंप्ट्रोलर अँड ऑडिटर जनरलचा १९९८ चा अहवाल सांगतो की, '७५०० कोटी रूपयांचे सीमाशुल्क माफ केलेल्या या क्षेत्रांमधून निर्यात केलेल्या मालातून फक्त ४७०० कोटी रुपयांचे परकीय चलन मिळाले.' लाभ–खर्चाचे गणित शासनाने केलेले दिसत नाही, असाही शेरा अहवालात मारलेला आहे. या अनुभवाचा चिकित्सक अभ्यास प्रथमत: गरजेचा आहे. दुसरा मुद्दा म्हणजे आज जगभरचे अनेक देश निर्यात स्पर्धेत उतरल्यामुळे भारताला कोणत्या क्षेत्रामध्ये आघाडी घेणे शक्य आहे याचा सखोल अभ्यास करावयास हवा व त्या आधारे आज अस्तित्वात असलेल्या 'निर्यात क्षेत्रात' विशिष्ट उत्तेजन योजना आखणे, हा निर्यात वाढवण्याच खरोखरचा हेतू असेल, तर योग्य मार्ग होय. असा काहीच अभ्यास केला जात नाही, कारण निर्यातवाढ ही केवळ सबब आहे. 'सेझ'चा प्रत्यक्ष हेतू वेगळाच आहे.

## ‘सेझ’चा खरा हेतू

सेझचा खरा हेतू निर्यात वाढवणे असा असता तर तेथील उत्पादने भारतात विकण्यास मुभा दिली नसती पण तशी अट कायद्यात नाही. शिवाय या क्षेत्रातील जागा निर्यात उद्योगांसाठीच वापरली पाहिजे अशीही अट नाही. येथील ७५ टक्के क्षेत्र हॉटेल, गोदामे, क्रीडा, मनोरंजन, सेवा, व्यापार, निवासी इमारती यासाठी व २५% क्षेत्र उद्योगांसाठी वापरण्याची मुभा आहे. या ‘स्वायत्त’ बेटांना या देशातील कर व इतर अनेक कायदे लागू होणार नाहीत. या परकीय बेटांवर प्रवेश करण्यासाठी भारतीय नागरिकांना ‘प्रवेशपत्रिका’ मिळवावी लागणार आहे. भारतीय नागरिकांच्या संचार–स्वातंत्र्यावर घाला घालणारी ही तरतूद भारतीय घटनेतील मूलभूत हक्कांवर घाला घालते, देशाच्या सार्वभौमतेचा भंग करते. या देशविघातक तरतुदींच्या व्यापक परिणामांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे. या तरतुदींचा आधार घेत ईशान्यतील काही राज्ये त्यांची राज्येच ‘खास आर्थिक क्षेत्रे’ म्हणून जाहीर करावी अशी मागणी करीत आहे. म्हणजे आर्थिक प्रगती साधता येईल व त्यांची स्वायत्तेची ईर्षाही पुरी होईल. या गुंतागुंतीचा विचारही न करता या जहागिऱ्या व मनसबदाऱ्या निर्माण केल्या जात आहेत. या कोणासाठी निर्माण केल्या जात आहेत? याचे उत्तर या क्षेत्रावर कोण उड्या मारत आहेत यांच्या यादीवर नजर टाकली तर सहज उघड होते. बडे बिल्डर, उद्योगसमूह, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या अखत्यारीखाली ही ‘परकीय बेटे’ येणार आहेत. भारताचे तथाकथित ‘लोकशाही’ शासन भारतीय जनतेच्या ‘लोकशाही हक्कां’चे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी सोडून लोकांच्या हक्कांवर बुलडोझर फिरवून ‘कॉर्पोरेट शक्ती’चे दलाल बनले आहेत. त्यामध्ये त्यांचेही हितसंबंध गुंतलेले आहेत. तेव्हा ‘सेझ’चा खरा हेतू बांधकाम–धंदा–उद्योग–व्यापार–व्यावसायिक व त्यांच्या संगन–मतातील राज्यकर्ते–बडे अधिकारी आणि त्यांचे हस्तक यांना नफ्याची कुरणे बहाल करणे हा होय.

### नफ्याची कुरणे

या क्षेत्रात परकीय भांडवल गुंतवणुकीला १०० टक्के मुक्त परवाना आहे. जकात कर, सीमा शुल्क, सेवा कर, मुद्रांक व नोंदणी शुल्क, विक्रीकर यातून पूर्ण सूट असेल. या क्षेत्रातील प्रवर्तक कंपन्यांना आयकरात १५ वर्षांच्या काळात कुठल्याही १० वर्षांसाठी ८०-ए नुसार सवलत, पायाभूत सुविधांवर खर्च केलेल्या निधीवर आयकर माफ, या क्षेत्रातील कंपन्यांच्या उत्पन्नावर पहिले पाच वर्षे आयकर माफी. पुढील ५ वर्षे निम्म्या दराने आयकर व त्यानंतर नफा पुन्हा कंपनीत गुंतवला तर त्यावर आयकर माफ, व्यक्तीगत गुंतवणुकीवर ८८व्या कलमाप्रमाणे आयकर माफी, भारतातून 'सेझ' कंपन्यांनी यंत्रसामग्री खरेदी केली तर त्यावर उत्पादन शुल्क व व्हॅट लागू होणार नाही.

लघु उद्योगांसाठी राखीव असलेल्या उद्योगांच्या क्षेत्रातही उत्पादन करण्यास 'सेझ'मध्ये मुभा देण्यात आली आहे. म्हणजे लघुउद्योगांवरही गंडातर येणार आहे. या क्षेत्रातील उद्योगांना आपल्या उत्पादनाचे या उत्पादन प्रक्रियेचे भाग भारतातील इतर भागांत किंवा अन्य 'सेझ'मध्ये पोट-कंत्राटी पद्धतीने देता येतील, किंवा परदेशातही थेट कंत्राटी पद्धतीने देता येईल. 'सेझ'ला भाडे नियंत्रण कायदा लागू नाही. नागरी कमाल जमीनधारणा कायदा लागू नाही. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील 'सेझ'साठी तर क्षेत्राची किमान मर्यादा केवळ १० हेक्टर आहे. तीही 'खास' कारणाने चारपर्यंत कमी करून घेऊन 'सेझ'च्या सर्व सवलती लाटता येतील. या परकीय बेटांच्या क्षेत्राला कमाल मर्यादा नाही. जे कंत्राटदार असे प्रकल्प हाती घेतील त्यांनाही १० वर्षे प्राप्तीकरातून सूट असल्याने 'सेझ' प्रकल्प म्हणजे 'बिल्डर'ना मोठी पर्वणीच आहे.

### लाभ-हानीचे उफराटे गणित

केंद्रीय मंत्री कमलनाथ यांच्या विधानानुसार 'सेझ'द्वारा १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. मात्र ही गुंतवणूक खेचताना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष करांच्या रूपाने येत्या चार वर्षात १६० हजार कोटी रुपयांवर पाणी

सोडले जात आहे. ‘१६० हजार कोटी रूपये गमावले जाणार’ हे केवळ हिमनगाचे टोक आहे. कारण देशभर १५०–२०० ‘परकीय बेटे’ उभी राहिल्यानंतर तेथील करमुक्ततेचा उपयोग फक्त त्या क्षेत्रातील उद्योगधंद्यासाठी घेतला जाईल असे मानण्याचे काहीच कारण नाही. भारतातील भ्रष्ट राजकीय व प्रशासकीय यंत्रणा, उद्योगधंदेवाईक व राजकरण्यांचे साटेलोटे आणि ‘व्यापार–उद्योग–बांधकाम धंदेवाले’ यांची चलाखी व हडेलहप्पी लक्षात घेलती तर ‘सेझ’मुळे भारतातील कर व्यवस्थेमध्ये ‘अराजक’ माजून शासन फार मोठ्या प्रमाणात कराचे उत्पन्न गमावण्याचा धोका आहे.

शासनाचे श्रीमंतांकडून घेतल्या जाणाऱ्या करांचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने त्याचा बोजा सर्वसामान्यांवर अप्रत्यक्ष करवाढ, भाववाढ करून टाकली जाईल, शिक्षण, आरोग्य आदी सेवांवरील खर्चाला कात्री लावली जाईल.

**नवी गुंतवणूक?**

असा दावा केला जातो की, ‘सेझ’मुळे भांडवली गुंतवणुकीत मोठी वाढ होईल. प्रत्यक्षात मात्र ‘जादा’ नवी गुंतवणूक न येता, आर्थिक_विकासाच्या कामात जी गुंतवणूक होणार आहे, त्याचे केंद्रीकरण ‘सेझ’मध्ये होण्यामुळे विकासातील असमतोल अधिकच वाढेल. एवढेच नव्हे तर आज एम.आय.डी.सीच्या महाड, रोहा, नागोठणे, पाताळगंगा अशा अनेक क्षेत्रातले कारखाने बंद वा मरणपंथाला लागले आहेत, ती क्षेत्रे अधिकच ओसाड बनतील. रिझर्व्ह बँकेच्या २००५–०६ सालचा वार्षिक अहवालही चिंता व्यक्त करतो की, अविकसित, मागास प्रदेशांमधील साधनसंपत्ती ‘सेझ’कडे खेचली जाऊन प्रादेशिक विषमता वाढेल.

**‘सेझ’चा वरवंटा**

‘सेझ’साठी सुमारे ४०३ प्रकल्प सरकारकडे मंजुरीसाठी आलेले आहेत व २३७ हून अधिक प्रकल्प मंजूरही झाले असून त्यासाठी सुमारे दीड लाख हेक्टर जमीन ताब्यात घेतली जाणार आहे. सर्वात अधिक प्रस्ताव

महाराष्ट्रातून आलेले असून त्यानंतर दिल्ली राजधानी नजिकचे हरियाणा राज्य, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तमीळनाडू – जेथे उद्योगधंदे व श्रीमंतीचे केंद्रीकरण आहे तेथेच हे केंद्रीकरण वाढणार आहे.

**बेरोजगारीचे महासंकट**

जेव्हा रोजगारनिर्मिती करीत असल्याचा शासन दावा करते तेव्हा शासन हे सांगत नाही की दीड लाख हेक्टराहून अधिक शेतजमीन संपादित करून हजारो शेतकरी, शेतमजूर आणि त्या खेडेगावामधील कारागीर, दुकानदार, व्यावसायिक, सेवक याची निर्वाह साधने व रोजगार नष्ट केल्याने बेरोजगारीचे केवढे महान संकट कोसळणार आहे. भारतीय श्रमिकांचा 'सेझ'च्या बुलडोझर खाली बळी देऊन, स्वदेशातच या श्रमिकांना 'निर्वासित' बनवून, कामासाठी 'भीक' मागायची वेळ लाखो श्रमिकांवर आणली जात आहे. या प्रचंड हानीची दखल लाभ–खर्चाच्या गणितामध्ये घेण्याची गरज शासनाला वाटत नाही. पण कधीच भरून न येणारी अशी ही हानी लादून घ्यायला शेतकरी तयार नाहीत. आणि म्हणूनच शेतकरी सेझविरोधात उग्र आंदोलने छेडत आहेत.

तेव्हा लाखो श्रमिकांवर बुलडोझर फिरवणाऱ्या, कोट्यवधी रुपयांचे कराचे उत्पन्न बुडवून करव्यवस्थेत अराजक माजवणारा श्रीमंतीचे केंद्रीकरण करणारा आणि मागास प्रदेश अधिकच उजाड बनवणारा, भारताची स्वायत्तता धोक्यात आणणारा, भारतीय घटना–विरोधी असा हा अनाधिकारी, देशविकाऊ 'सेझ' कायदा ताबडतोब रद्दबातल करायला लावण्याची जबाबदारी आपणा सर्व भारतीय नागरिकांवर आहे.

● ● ●

# संघर्षाचे नवे मार्ग हवेत

**उल्का महाजन**

स्पेशल इकॉनॉमिक झोन जिथे येत आहेत, त्यापैकी बहुतेक ठिकाणी शेतजमीन संपादित करण्यात येत आहे. सर्वात मोठा झोन आहे रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल, उरण या तालुक्यातील ४५ गावांच्या १४,००० हेक्टर जमिनीवर आणि हा झोन उभारण्याची जबाबदारी आहे अंबानी उद्योग समूहावर.

रायगड जिल्ह्यातील ही जमीन म्हणजे जिल्ह्यातील सर्वात सुपीक जमीन आहे. जिल्ह्यात या भूभागाला भाताचे कोठार म्हणून ओळखले जाते. इथला शेतकरी या शेतीवर आपली उपजीविका भागवतो. एवढेच नाही तर तो खाऊन–पिऊन समृद्ध आहे. त्यामुळेच ही जमीन सेझसाठी देण्यास संपूर्ण शेतकरीवर्गाचा कडवा व तीव्र विरोध आहे. म्हणून शेतकरी संघर्षाच्या पावित्र्यात आहेत.

इथे प्रश्न फक्त जमिनीच्या भावाचा नाही. कारण सेझच्या एकूण प्रश्नात जमीन संपादनामुळे निर्माण होणारे प्रश्न हा मोठा भाग असला तरी पर्यावरणाचे, पंचायत व्यवस्थेच्या अस्तित्वाचे, देशाच्या सार्वभौमत्वाचे, लोकशाही व आर्थिक व्यवस्थेचे प्रश्न अधिक गंभीर आहेत. या साऱ्यांमुळे उभ्या राहणाऱ्या संकटांना हटवण्यासाठी येथील शेतकरी संघर्षासाठी तयार होतो आहे.

एखाद्या विभागातील हजारो हेक्टर शेतजमीन जेव्हा संपादित होते. तेव्हा प्रश्न फक्त जमिनीच्या भावाचा रहात नाही. त्या शेतीवर अवलंबून असणारे शेतकऱ्यांशिवाय अन्य समूह देखील असतात. शेती ही अर्थव्यवस्था आहे तशीच ती रोजगाराची व्यवस्था पण आहे. त्यामुळे त्या क्षेत्रातील शेतमजूर, मच्छिमार, मिठागर मालक, मीठ उत्पादक, तेथील

कामगार, राइसमिल मालक, मिलमधील कामगार, बैलगाडीवाले, ट्रक ड्रायव्हर, ट्रकवरील कामगार अशी मोठी साखळीच आहे. ज्यांची उपजिवीका देखील या शेतीव्यवस्थेवर अवलंबून आहे. ह्या साऱ्यांची उपजीविकेची साधने हिरावली जाणार आहेत व त्यांच्या नुकसानीची भरपाई कुठल्याही प्रकारे करण्याची जबाबदारी ना शासनाने स्वीकारली आहे ना अंबानींनी. ज्यांची जमीन जाते आहे त्या साऱ्या कुटुंबातील एका सदस्यालाही नोकरी देणे शक्य नाही असे म्हणत अंबानींनी आधीच जबाबदारी झटकली आहे. मग या अन्य कुटुंबांचे काय विचारता? त्यांना ना नुकसान भरपाई ना नवीन रोजगार.

असाच प्रश्न जेथे जेथे शेतजमीन जात आहे तिथे उभा रहतो आहे व संघर्ष आकार घेतो आहे. पुणे जिल्ह्यातील माण, चाकण, राजगुरुनगर, खेड तसेच लोणावळा जवळील कार्ला येथेही शेतकरी संघटित होत आहेत. देशभरात उत्तर प्रदेश, हरियाना, प. बंगाल गुजरात, आंध्र प्रदेश, राजस्थान, ओरिसा, छत्तीसगड, झारखंड येथे देखील लोक आवाज उठवत आहेत. रस्त्यावर उतरत आहेत. प्रसंगी पोलिसांचा लाठीमार सहन करीत आहेत.

एवढा विरोध सामान्य जनतेचा होत असूनही ज्या देशात भांडवलदारांच्या दबावाखाली सेझचे धोरण पुढे रेटले जाते तेथील लोकशाही संपली आहे हे उघड आहे व तेथील सरकारने देखील आपला कल्याणकारी राज्याचा मुखवटा काढून फेकला आह. हे स्पष्ट आहे. देशाचे राज्यकर्ते आज बाजारव्यवस्थेचे व भांडवलदारांचे गुलाम झाले आहेत. त्यामुळे सेझसारखा कायदा आणला जातो व पद्धतशीर नियोजनाने जनतेला अंधारात ठेवून तो पास केला जातो.

तेव्हा गरज आहे लोकशाही टिकवण्यासाठी साऱ्या जनतेने जागे होण्याची व ताकद एकटवून या राज्यकर्त्यांवर्गाविरुद्ध दंड थोपटण्याची.

सेझविरुद्धचा संघर्ष एकाच वेळी अनेक स्तरांवर करावा लागणार आहे.

सक्तीच्या भूसंपादनाविरुद्ध शेतकऱ्यांचा लढा, त्यांना साथ देत कामगारांचा संघर्षात सहभाग, पर्यावरणाच्या प्रश्नावर अन्य संघटनांचे आंदोलन, करदात्या मध्यम वर्गांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागृती,

प्रसारमाध्यमांमधून सातत्याने चर्चा, लोकप्रतिनिधींचे प्रबोधन व संसद, विधान मंडळामधून चर्चा व  यातून एकसंघ सातत्याने उभे रहाणारे जनआंदोलन असा त्याचा वाढता परीघ असावा लागेल.

स्थानिक पातळीवर दलालांचा मुकाबला व कॉर्पोरेट कंपन्यांचे साम, दाम, दंड, भेदाची आधुनिक तंत्रे व कारस्थाने यांना तोंड देणे हे देखील मोठे आव्हान आहे. रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांनी तहसीलदार कार्यालयावर काढलेल्या मोर्च्यात रिलायन्सने दलाल घुसवून दगडफेक घडवून आणली व ते निमित्त करून पोलिसांनी लोकांवर लाठीमार केला आणि सर्व मुख्य कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना अडकवले आहे.

याच प्रकारची तंत्रे अवलंबून अन्यत्र देखील लोकांची ताकद तोडण्याच्या कारवाया सुरु आहेत. एवढेच नव्हे तर लोकांना 'मॅनेज' करण्यात कुशल असणारे सरकारी अधिकारी मोठ्या प्रमाणात या कंपन्यांना सामील होत आहेत. शासन देखील यांच्या रजा मंजूर करत आहे. 'कंपनी' सरकारचा हा आणखी एक पैलू आहे. शासन जनतेप्रती कटिबद्ध नसून भांडवलदार व बाजारपेठेच्या आहारी गेले आहे. याचा हा पुरावाच आहे. हे सरकारी अधिकारी भांडवलदारांचे दलाल बनून लोकांची ताकद तोडण्याचे विविध कावे रचत आहेत. याचा सामना हा संघर्षाचा महत्वाचा भाग रहाणार आहे. या दलालांना आळा घालण्यासाठी गावकऱ्यांनीच गाव पातळीवर नियोजन करण्याची गरज आहे.

सेझच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांचा लढा हा केवळ स्थानिक पातळीवर राहून चालणार नाही. सर्व ठिकाणच्या शेतकऱ्यांचा संघटना एकत्र येऊन मोठे जनआंदोलन उभे रहाण्याची आवश्यकता आहे.

राज्यकर्ते जेव्हा देश व देशाच्या जनतेला विकायला निघतात तेव्हा जनतेने जागे राहून त्यांना खाली खेचण्याचे काम लोकशाहीत करायला हवे.

• • •

# सरकारमान्य स्वस्त व सुलभ रिअल इस्टेट योजना

- बेंगलोर, म्हैसूर इन्फ्रास्ट्रक्चर कॉरिडॉर प्रोजेक्टमध्ये आवश्यक त्यापेक्षा १०,९४५ एकर जादा जमिनीसकट २९,२५८ एकरांचे संपादन करण्यात आले. जमीनीची जुजबी किंमत लावूनही कंपनीला त्यांच्या कंत्राटाव्यतिरिक्त रु. १०,००० कोटींची जमीन मोफत मिळते. या प्रकल्पामुळे २०,००० शेतमजूर व शेतकऱ्यांवर विस्थापनाचे संकट.
- उत्तर प्रदेशात गाजियाबाद जिल्ह्यात दादरी गावची २१०० एकर जमीन रिलायन्स एनर्जी कंपनीला ३५०० मेगावॅट वीज केंद्रासाठी दिली गेली. कंपनी धौलाना भागातील आणखी ४०० एकर जमीन घेण्याच्या मागे आहे. रिलायन्स एनर्जीला ४० टक्के दर कमी करून नाममात्र दरावर ९९ वर्षांच्या लिजने जमीनी दिल्या गेल्या.
- अत्यंत सुपीक जमीन असलेल्या बाजेरा खु।। गावाकडच्या जमिनीला रु. १५० ला एक चौरस यार्ड हा भाव देऊन उत्तर प्रदेश सरकारने विकत घेतली. (१ एकर = ४८४० चौ. यार्ड). शेतकऱ्यांनी बाजारभाव रु. ५०० प्रति चौरस यार्ड असा मागितला. २५ नोव्हेंबर २००५ ला लोकांचा उपवास सुरू झाला. आठ महिन्यांनंतर त्यांनी कंपनीचे कुंपण तोडून औत चालविण्याचा निर्णय घेतला. उत्तर प्रदेश सरकारने सशस्त्र ७ व ८ जुलै २००६ रोजी बाजेरा खु।। च्या लोकांवर हल्ला चढविला.
- महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यात पाच तालुक्यात ३५,००० एकर रिलाायन्स व इतरांना राज्य सरकारने जमीन संपादित करून द्यायचे ठरविले. त्यासाठी जिल्हा कार्यालयातील अधिकारी ज्यादा काम करीत आहेत.
- मेरिल लिंच या वित्तिय कंपनीने केलेल्या भाकितानुसार भारतातील बांधकाम जमिनीचा व्यवसाय (रिॲलिटी सेक्टर) हा २००५ मध्ये

१२०० कोटी डॉलर्स वरून २०१२ मध्ये ९००० कोटी डॉलर्स वर जाईल. भारतात २७० कोटी डॉलर्सची रिअल इस्टेटसाठी गुंतवणूक या पूर्वीच नियोजित आहे; जे. पी. मार्गन, नाइट फ्रँक व अन्य बहुराष्ट्रीय गुंतवणुकदारांनी आणखी ४०० कोटी डॉलर्सची योजना बनविली आहे.

• • •


**नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसी स्टडीज, पुणे निर्मित**
**व अतुल पेठे दिग्दर्शित माहितीपट**

***एस ई झेड (सेझ)***

**अराजकता की ओर...**

**(हिंदी वृत्तचित्र)**

**व**

**अराजकाची नांदी (मराठी)**

**उपलब्ध आहेत, कृपया खालील पत्त्यावर चौकशी करावी.**

सेरेनेटी कॉम्प्लेक्स, रामनगर कॉलनी, पाषाण,
पुणे ४११ ०२१. महाराष्ट्र
फोन : ०२०-२२९५२००३/४, २२९५१८५७
इ-मेल : ncas@vsnl.com

**भारत सरकार केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालय**
**सेझ कायदा अंमलात आल्यापासून बोर्डाने मंजूरी दिलेले सेझ**
**खालील यादीतील सेझ क्षेत्रांना ऑक्टोबर २००६ पर्यंत मंजुरी मिळाली होती.**

| अ. | राज्याचे नाव | औपचारीक मान्यता | तत्वत: मान्यता | सेझ संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | आंध्र प्रदेश | ४५ | ०९ | ५४ |
| २. | छत्तीसगड | - | ०२ | ०२ |
| ३. | दादरा नगर-हवेली | - | ०१ | ०१ |
| ४. | चंदीगड | ०२ | - | ०२ |
| ५. | दिल्ली | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | गोवा | ०४ | - | ०४ |
| ७. | गुजरात | १८ | १२ | ३० |
| ८. | हरियाणा | १९ | २७ | ४६ |
| ९. | हिमाचल प्रदेश | - | ०३ | ०३ |
| १०. | झारखंड | ०१ | - | ०१ |
| ११. | कर्नाटक | २९ | १७ | ४६ |
| १२. | केरळ | १० | ०२ | १२ |
| १३. | मध्यप्रदेश | ०४ | ०६ | १० |
| १४. | महाराष्ट्र | ४८ | २७ | ७५ |
| १५. | ओरिसा | ०५ | ०७ | १२ |
| १६. | पॉण्डीचेरी | ०१ | - | ०१ |
| १७. | पंजाब | ०४ | ०७ | ११ |
| १८. | राजस्थान | ०३ | ०८ | ११ |
| १९. | तमीळनाडू | २५ | १२ | ३७ |
| २०. | उत्तरांचल | ०३ | ०१ | ०४ |
| २१. | उत्तरप्रदेश | ०८ | १० | १८ |
| २२. | पं. बंगाल | ०७ | १४ | २१ |
| | **एकूण** | **२३७** | **१६६** | **४०३** |

## महाराष्ट्रातील एस.ई.झेड.ची स्थिती पुढीलप्रमाणे
## औपचारिक मान्यताप्राप्त सेझ

| अ.क्र. | विकासकाचे नाव | ठिकाण | सेझप्रकार | क्षेत्र हेक्टरमध्ये |
|---|---|---|---|---|
| १. | एम.आय.डी.सी. | राजीव गांधी इन्फोटेक पार्क हिंजवडी, पुणे | आय.टी./आय. टी.इ.एस. | २२९.३ |
| २. | सीन्टेल इन्टरनॅशनल प्रा. लि. | तळवडे सॉफ्टवेअर पार्क, पुणे | आय.टी./आय. टी.इ.एस. | १६ |
| ३. | सीरम इन्टिट्यूट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया | पुणे | फॉर्मा व बायोटेक | २१ |
| ४. | एम.आय.डी.सी. | नांदगाव पेठ, जि. अमरावती | मल्टी प्रॉडक्ट | १०१० |
| ५. | एम.आय.डी.सी. | जालना, जि. जालना | बायोटेक्नॉलॉजी | ४०.३३ |
| ६. | एम.आय.डी.सी. | कागल, कोल्हापूर | टेक्स्टाईल | १०४ |
| ७. | एम.आय.डी.सी. | क्रूशनूर, जि. नांदेड | फॉमॉस्यूटिकल्स | १५० |
| ८. | एम.आय.डी.सी. | लातूर | ॲग्रो-डाळी | २०० |
| ९. | एम.आय.डी.सी. | शेंद्रा, जि. औरंगाबाद | ॲटोमोबाईल | २१० |
| १०. | एम.आय.डी.सी. | बुटीबोरी, नागपूर | टेक्स्टाईल | ३८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. एम.आय.डी.सी. | शेंद्रा. औरंगाबाद | फॉर्मा व बायोटेक्नॉलॉजी | १०७ |
| १२. बजाज ॲटो लिमिटेड | वाळुंज, औरंगाबाद | ऑटोमोबाईल व कंपोनंटस् | १०० |
| १३. हिरानंदानी बिल्डर्स | पोवई, मुंबई | आय. टी./आय.टी.इ.एस. | १२.५७ |
| १४. झीयस इन्फ्रास्टक्चर प्रा. लि. | कोपरी, ता. जि. ठाणे | आय. टी./आय.टी.इ.एस. | ५४.२२ |
| १५. एम.आय.डी.सी. | सोलापूर | टेक्स्टटाईल्स इंडस्ट्री | १९५ |
| १६. एम.आय.डी.सी. | यवतमाळ | टेक्स्टटाईल्स इंडस्ट्री | २०८ |
| १७. ब्लारीजेस हॉटेल्स प्रा. लि. | चाक, खालापूर, रायगड | मल्टी सर्व्हिसेस | २४२ |
| १८. न्यू फाइंड प्रापर्टिज ॲण्ड लिजिंग प्रा. लि. | जुईनगर, ठाणे | आय. टी. | २१.४१ |
| १९. मगरपट्टा टाऊनशिप डेव्हलपमेंट, कन्स्ट्रक्शन लि. | मगरपट्टा, पुणे | इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, आय. टी. | ११.९८ |
| २०. इऑन, खराडी इन्फ्रास्टक्चर | खराडी, पुणे | आय. टी. आय.टी.एस. | १८ |
| २१. विप्रो लिमिटेड | पुणे | आय. टी. / आय.टी.एस. | २०.२३ |
| २२. विराज प्रोफाईल्स लि. | आमगाव, वाडा, जि. ठाणे | स्टेनलेस स्टील/इंजिनियरिंग | २३५ |
| २३. महिंद्रा जेसिको डेव्हलपर्स लि. | ओवळे, घोडबंदर रोड, ठाणे | बायोटेक्नॉलॉजी | २८ |
| २४. इन्फोसिस लि. | पुणे | आय. टी. / आय.टी.इ.एस. | ७९.८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. कुमार बिल्डर्स टाऊनशिप व्हेन्चर्स प्रा. लि. | हिंजवडी व माण पुणे | इलेक्ट्रॉनिक्स, हार्डवेअर, सॉफ्टवेअर, आय.टी. आय.टी.एस. | ४९.१ |
| २६. फ्लॅगशिप इन्फ्रास्ट्रचर प्र. लि. | हिंजवडी, पुणे | आय. टी. | २८ |
| २७. सीरेन प्रापर्टिज प्रा. लि. | ऐरोली | आय. टी. | १४.७ |
| २८. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. | मिहान, नागपूर | मल्टी प्रॉडक्ट | २०८६ |
| २९. वेल्सपन अनजर पेस लि. | वरसमेडी, ता. अजनर | टेक्स्टाईल्स, गारमेंट सेक्टर | २८४ |
| ३०. बालाजी इन्फ्रा प्रोजेक्ट लि. | दिघी पोर्ट, जि. रायगड | पोर्टबेस्ड, सेझ, मल्टी प्रॉडक्स | १०० |
| ३१. इंटरनॅशनल बायोटेक पार्क लि. | हिंजवडी, पुणे | बायोटेक | १३ |
| ३२. गीतांजली जेम्स लि. | पनवेल, चिरावत जि. रायगड | जेम्स, ज्वेलरी | १०.०२ |
| ३३. एम.आय.डी.सी. | अंबरनाथ, जि. ठाणे | आय. टी. आय. टी. इ. एस. | १६.५ |
| ३४. एम.आय.डी.सी. | पुणे जिल्हा | टेक्स्टाईल्स | १०१ |
| ३५. रॉयल पाम्स इंडिया लि. | आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव, (इ.) मुंबई | आय. टी. आय. टी. इ. एस. | १०.१ |
| ३६. एम.आय.डी.सी. | लोटे परशुराम, जि. रत्नागिरी | फॉर्मा | २०० |
| ३७. एम.आय.डी.सी. | भद्रावती, जि. चंद्रपूर | पॉवर जनरेशन | ११०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. एम.आय.डी.सी. | एस्सार, रायगड | पॉवर जनरेशन | १०३ |
| ३९. चिपळूण इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | मुंबई | एफ. टी. डब्लू. झेड | ४० |
| ४०. सीटी पार्म प्रा. लि. | गहुंजे, ता. हवेली, जि. पुणे | इलेक्ट्रानिक्स, आय.टी./ आय.टी.इ.एस. | ३० |
| ४१. ब्रॉड वे इंटिग्रेटेड पार्क | ताथवडे, ता. मुळशी, जि. पुणे | आय. टी./ आय. टी. इ. एस. | १०.५५ |
| ४२. मुठा रिअल्टी प्रा. लि. | लोहगाव, ता. हवेली. जि. पुणे | आय. टी./ आय. टी. इ. एस. | १०.२७ |
| ४३. कॉरमेल गऊसिंग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | खारी. जि. ठाणे | आय. टी./ आय. टी. इ. एस. | ४१ |
| ४४. लोढा डेव्हलपमेंट प्रा. लि. | ठाणे | आय. टी./ आय. टी. इ. एस. | - |
| ४५. मांजरी स्टड फॉर्म | पुणे | आय. टी./ आय. टी. इ. एस. | - |
| ४६. के रहेजा युनिव्हर्सल | नवी मुंबई | आय. टी./ आय. टी. इ. एस. | २०.६४ |
| ४७. के रहेजा युनिव्हर्सल | नवी मुंबई | आय. टी./ आय. टी. इ. एस. | १३ |
| ४८. मॅरोथॉन पाचीन इंन्फ्राकस्ट्रचर | रायगड | मल्टी प्राडक्डस् | ४०० |

## मान्यता मंडळाची तत्वत: मान्यता प्राप्त सेझ

| अ.नु. | विकासक | ठिकाण | सेझप्रकार | क्षेत्र हेक्टरमध्ये |
|---|---|---|---|---|
| १. | दिवाण इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. | वसई, जि. ठाणे | मल्टी प्रॉडक्टस् | १०११ |
| २. | महिंद्रा रिअल्टी डेव्हलपर्स लि. | लोणावळा, जि. पुणे | मल्टी प्रॉडक्टस् | १००० |
| ३. | एम. आय. डी. सी. | ॲडिशनल सिन्नर, नाशिक | मल्टी प्रॉडक्टस् | १०१० |
| ४. | भारत फोर्ज लि. | गुळाणी, ता. खेड, जि. पुणे | मल्टी प्रॉडक्टस् | २००० |
| ५. | पॅन इंडिया पर्यटन | गोराई, मुंबई | मल्टी प्रॉडक्टस् | १००० |
| ६. | अरिहंत टेक्नो इकॉनॉमिक्स पार्क प्रा. लि. | भिवंडी, ठाणे | टेक्स्टाईल्स | १०७ |
| ७. | झान्सा इंडिया लि. | तळवडे, पुणे | सॉफ्टवेअर, आय. टी. | १० |
| ८. | एम. आय. डी. सी. | एसार, रायगड | कॅपटिव्ह पॉवर जनरेशन इंड. | १०३ |
| ९. | एम. आय. डी. सी. | भ्रदावती, चंद्रपूर | कॅपटिव्ह पॉवर जनरेशन | ११०० |
| १०. | पार्श्वनाथ डेव्हलपर्स | पुणे | ॲटोमोटिव्ह ॲण्ड ऑटो कंपोनंट | १०० |
| ११. | टाऊनशिप डेव्हलपर्स इंडिया प्रा. लि. | ता. मावळ, जि. पुणे | मल्टी प्रॉडक्टस् | २००० |
| १२. | मॅरथॉन रिअल्टी लि. | पनवेल, जि. रायगड | मल्टी प्रॉडक्टस् | ११०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | सुप्रीम पेट्रोकेम लि. | रोहा, ता. जि. रायगड | प्लॅस्टिक प्रोससिंग | १०० |
| १४. | सनी विस्टा रिअलटर्स प्रा. लि. | भोकरपाडा, ता. पनवेल जि. रायगड | सर्व्हिसेन | १०३.२ |
| १५. | पुणे हायटेक इन्फ्रा सेझ प्रा. लि. | ता. मावळ, जि. पुणे | इंजिनियरींग | १०९.८९ |
| **१६.** | **व्हिडिओकॉन रियल्टी ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि.** | **वाघोली, लोणी, जि. पुणे** | **मल्टी प्रॉडक्टस्** | **१२००** |
| **१७.** | **व्हिडिओकॉन रिअल्टी ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि.** | **वाघोली, लोणी (खु), पुणे** | **मल्टी प्रॉडक्टस्** | **१२००** |
| **१८.** | **व्हिडिओकॉन रिअल्टी ॲण्ड** इन्फ्रास्ट्रक्चर लि. | **घानोली, आडगाव (औरंगाबाद)** देनकाई, बाळापूर (औरंगाबाद) चिंचोली (औरंगाबाद) | **मल्टी प्रॉडक्टस्** | **२७६३** |
| १९. | निर्मल रिअल्टी प्रा. लि. | भोकरी, डोहळे, कोशिंबी ता. भिवंडी, जि. ठाणे | टेस्टाईल्स व गारमेन्ट सेक्टर | १६२ |
| २०. | शापूरजी पालोनजी ॲण्ड कंपनी लि. | केलवड, ता. सावनेर, जि. नागपूर | सर्व्हिसेस | १०० |
| २१. | लोढा डेव्हलपर्स प्रा. लि. | पोसरी, आंबोशी, चिरनाड, कुभांर्ली, साकरोळी, वाडी, करावली, जि. ठाणे | टेक्स्टाईल्स | ३६० |

| | | | |
|---|---|---|---|
| **२२. इंडिया बुल्स इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलमेंट लि.** | **रायगड** | **मल्टी प्रॉडक्टस्** | **२४२९** |
| **२३. एम. आय. डी. सी.** | **कणकवली, ता. जि. सिंधुदूर्ग** | **मल्टी प्रॉडक्टस्** | **१५००** |
| २४. एम. आय. डी. सी | शेंद्रा, जि. औरंगाबाद | बायोटेक | २०० |
| २५. हाऊसिंग डेव्हलपमेंट इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ठाणे | मल्टी प्रॉडक्टस् | १८० |
| २६. कयूपो इन्फ्रास्ट्रक्चर | रायगड | इंजिनियरिंग | १८० |
| **२७. अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर हाऊसिंग प्रा. लि.** | **सावंतवाडी, ता. जि. सिंधुदूर्ग** | **मल्टी प्रॉडक्टस्** | **१२५०** |

*संदर्भ : केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या वेबसाईटवरून साभार.*

## सेझविरोधी संघर्ष करणाऱ्या समितीत सहभागी पक्ष व संघटना

- शेतकरी कामगार पक्ष
- भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)
- भारतीय कम्युनिस्ट पक्ष
- सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा नंदूरबार
- सत्यशोधक कम्युनिष्ट पक्ष
- जनता दल (से)
- समाजवादी जन परिषद
- लाल निशाण पक्ष (लेनिनवादी)
- आर. पी. आय. (खोब्रागडे)
- भारिप–बहुजन महासंघ
- कामगार आघाडी
- राष्ट्रसेवा दल
- पीपल्स डेमोक्रॅटिक फ्रंट ऑफ इंडिया
- सेझविरोधी संघर्ष समिती, पुणे
- विशेष आर्थिकक्षेत्र हटाव संघर्ष समिती, रायगड
- गिरणी कामगार संघर्ष समिती, मुंबई
- सेझ विरोधी स्थानिक संघर्ष समिती, पिंपरी–चिंचवड
- लोकसंघर्ष मोर्चा, महाराष्ट्र
- जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय
- पेण पंचक्रोशी शेती बचाओ समिती
- शोषित जन आंदोलन
- सर्वहारा जन आंदोलन, माणगांव
- खेड तालुका पूर्व विभाग एम.आय.डी.सी. विरोधी कृती समिती
- एकवीरा जमीन बचाओ आंदोलन, कार्ला
- माण बचाओ कृती समिती
- नागरी हक्क सुरक्षा समिती, पिंपरी–चिंचवड
- सह्याद्री बचाओ आंदोलन , पिंपरी–चिंचवड
- लोक राजनीति मंच
- नर्मदा बचाओ आंदोलन
- राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र
- जमीन, जंगल, पाणी लोकाधिकार आंदोलन
- पाबळ जमीन बचाओ कृती समिती
- श्रमिक क्रांती संघटना
- स्थानिक भूमिपुत्र शेतकरी सेवा समिती, पेण
- पंचक्रोशी खारभूमी शेती बचाव समिती
- हेटवणे सिंचन क्षेत्र बचाव समिती, पेण
- ठाकूरबेडी विकास आघाडी, पेण

- आदिवासी हक्क संघर्ष समिती, रायगड
- जागृत कष्टकरी संघटना, कर्जत
- शेतकरी अन्याय निवारण संघर्ष समिती
- टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई
- धरमतर खाडी बचाओ कृती समिती, पेण
- कष्टकरी महिला आघाडी, पुणे
- वाघई महिला फेडरेशन, पुणे
- आदिवासी जाणीवजागृती विकास मंच, पुणे
- विकास सहयोग प्रतिष्ठान, मुंबई
- जमीन, जंगल, पाणी, लोकाधिकार आंदोलन
- ॲक्शन फॉर ॲग्रिकल्चरल रिन्युअल इन महाराष्ट्र (ग्रामवर्धिनी), पुणे
- कबीर कलामंच, पुणे
- लोकयत, पुणे
- राष्ट्रीय ग्रामीण मजदूर अभियान समिती
- शेतकरी शेतमजूर पंचायत, महाराष्ट्र
- मानवी हक्क अभियान, बीड
- भारतीय महिला फेडरेशन, पुणे
- अखिल भारतीय जनवादी महिला संघटना
- नारी समता मंच, पुणे
- गोसी खु।। प्रकल्प संघर्ष समिती, नागपूर
- इस्टर्न महाराष्ट्र बँक एम्प्लाईज असोसिएशन, नागपूर
- जि. प. कर्मचारी महासंघ, नागपूर
- राष्ट्रीय वनश्रमजीवी मंच, नागपूर
- कष्टकरी जनआंदोलन, नागपूर
- जागतिकीकरण विरोधी कृती समिती, महाराष्ट्र
- मराठवाडा लोकविकास मंच, लातूर

■

**अधिक संपर्कासाठी :**
**राष्ट्रीय जनवकालत अध्ययन केंद्र**
सेरेनेटी कॉम्प्लेक्स, रामनगर कॉलनी, पाषाण, पुणे ४११ ०२१. महाराष्ट्र
फोन : ०२०-२२९५२००३/४, ०२०-२२९५१८५७
इ–मेल : ncas@vsnl.com वेबसाईट : www.ncasindia.org
उल्का महाजन : ९८६९२३२४७८ / संपत काळे : ९४२३२०२२०२
संजय संगवई : ९८९००२५४७९/ सुनीती सु. र. ०२०–२४२५१४०४